# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

539, राजेंद्रनगर, कोल्हापूर-416 004.

दुरध्वनी क्र-0231-2696101/2/3 Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/भांडार/ 3327

दिनांक : 16.09.2026

प्रति,

**सर्व केंद्र संचालक**
इ.10 वी/12वी (फेब्रु-मार्च/जून-जुलै 2026)
द्वारा प्राचार्य/मुख्याध्यापक
माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय** :- सन 2027 मधील इ.10 वी व इ.12 वी परीक्षांसाठी जुन्या उत्तरपत्रिका, पुरवणी इ. स्टेशनरी साहित्य न वापरता मंडळाकडे जमा करण्याबाबत...

**संदर्भ** :- राज्य मंडळ, पुणे पत्र क्र.रा.मं./भांडार-5/3600 दि.28.08.2026

उपरोक्त विषयास अनुसरुन सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील इ.10 वी व 12 वी च्या सर्व केंद्र संचालकांना सूचित करण्यात येते की, राज्य मंडळाच्या संदर्भीय पत्राच्या निर्णयानुसार इ.10 वी व इ.12 वी च्या फेब्रु-मार्च 2027 परीक्षेसाठी इ.10 वी ची मुख्य उत्तरपत्रिका 20 पानी तसेच इ.12 वी ची मुख्य उत्तरपत्रिका 28 पानी ऐवजी 20 पानी वेगळ्या स्वरुपाची असणार आहे. तसेच सदर परीक्षेसाठी कोणत्याही परिस्थितीत यापूर्वीच्या परीक्षांच्या शिल्लक मुख्य उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे इ. वापरावयाचे नाहीत.

तरी, आपण आपणांकडे यापूर्वीच्या काही मुख्य उत्तरपत्रिका पुरवण्या, आलेख, नकाशे इ. शिल्लक असल्यास त्यांची संख्या सोबत दिलेल्या तक्त्यात भरुन उलटटपाली मेल द्वारे, पत्राद्वारे, हस्तपोच या कार्यालयास आठ दिवसांत कळवावी व सर्व साहित्य संकलित करुन एकत्रित बांधून ठेवावे. सदर साहित्य खास वाहनामार्फत मंडळाकडून संकलित केले जाणार असल्याने ते त्वरीत तयार ठेवावे. कोणत्याही परिस्थितीत जुने साहित्य वापरावयाचे नसल्याने ते केंद्रांवर न ठेवता मंडळाकडे जमा करावे.

(गजानन उकिर्डे)
प्र. विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

सोबत - प्रपत्र "अ" व प्रपत्र "ब"

प्रपत्र - "अ"

## इ.12 वी शिल्लक उत्तरपत्रिका, पुरवणी इ.स्टेशनरी दर्शविणारा तक्ता

परीक्षा केंद्राचे नांव -

| अ.क्र. | छपाईचा प्रकार | शिल्लक संख्या |
|---|---|---|
| 1 | 28 पानी उत्तरपत्रिका | |
| 2 | 4 पानी पुरवणी उत्तरपत्रिका | |
| 3 | 4 पानी प्रात्यक्षिक पुरवणी | |
| 4 | 4 पानी नकाशा पुरवणी | |
| 5 | 4 पानी आलेख पुरवणी | |
| 6 | 2 पानी तोंडी उत्तरपत्रिका | |

प्रपत्र - "ब"

## इ.10 वी शिल्लक उत्तरपत्रिका, पुरवणी इ.स्टेशनरी दर्शविणारा तक्ता

परीक्षा केंद्राचे नांव -

| अ.क्र. | छपाईचा प्रकार | शिल्लक संख्या |
|---|---|---|
| 1 | 20 पानी उत्तरपत्रिका | |
| 2 | 4 पानी पुरवणी उत्तरपत्रिका | |
| 3 | 4 पानी प्रात्यक्षिक पुरवणी | |
| 4 | 4 पानी नकाशा पुरवणी | |
| 5 | 4 पानी आलेख पुरवणी | |
| 6 | 2 पानी तोंडी उत्तरपत्रिका | |